PRC/PR/29/2025

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एमएमआरडीएने ५०० देशी वृक्षांच्या रोपांची केली लागवड

## पर्यावरण जनजागृतीसाठी विशेष कार्यशाळा घेणार

**मुंबई, ५ जून २०२५**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) व महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने एमएमआरडीए चे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे (IAS) यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिन २०२५ चा उत्सव मोठ्या उत्साहात महाराष्ट्र निसर्ग उद्यान, धारावी येथे साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी निसर्ग फेरीत सहभाग घेत परिसरातील जैवविविधतेचा अनुभव घेतला. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते ५०० देशी वृक्षांची सामूहिक लागवड करत पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

**लागवड करण्यात आलेल्या देशी वृक्षांमध्ये खालील प्रजातींचा समावेश:**

करंज, आपटा, बहावा, पेटी बदाम, कांचन, वड, उंबर, मोह, पुत्रंजीवा, टेंभुर्णी, शिवण आणि सीता अशोक.

देशी वृक्ष लागवडीचे मुख्य फायदे:

- जैवविविधतेचे संवर्धन: स्थानिक कीटक, पक्षी व प्राण्यांसाठी नैसर्गिक अधिवास.
- मातीची धूप रोखणे: मजबूत मुळे जमिनीला घट्ट पकडतात.
- कमी देखभाल: कमी पाणी, खत व औषधांची गरज.
- स्थानिक संस्कृतीशी नाते: पारंपरिक आणि धार्मिक वापरासाठी उपयुक्त.
- सेंद्रिय शेतीला हातभार: जैविक खत व कीटकनाशकांची निर्मिती शक्य.

या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे, महानगर आयुक्त, एमएमआरडीए हे म्हणाले की,

**"प्राधिकरणातर्फे सर्व पायाभूत प्रकल्पांमध्ये पर्यावरणाशी सुसंगतता ही आमची मूलभूत मूल्यप्रणाली आहे. शाश्वत नागरीकरण आणि हरित भविष्यासाठी अशा उपक्रमांतून पर्यावरण संवर्धनात सक्रिय योगदान देणे ही काळाची गरज आहे.म्हणूनंच शून्य कार्बन उत्सर्जन करणारी मेट्रो नेटवर्क घडवत**

**आहोत, प्रकल्पात कमीत कमी झाडे कापली जातील आणि त्यांच्या कित्येक पटीने आपण झाडे लावत आहोत."**

**प्लास्टिकमुक्तीचा संदेश:**

यंदाच्या जागतिक पर्यावरण दिनाची अधिकृत थीम प्लास्टिक ने होणारया प्रदूषणाचा अंत "(Ending Plastic Pollution)" ही असून, त्यानुसार प्लास्टिकविरोधी जनजागृतीही या कार्यक्रमात करण्यात आली. विद्यार्थ्यांना प्लास्टिकच्या हानिकारक परिणामांबाबत माहिती देण्यात आली आणि त्याचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

**८ जून रोजी चर्चासत्र:**

या थीमनुसार, ८ जून २०२५ रोजी स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी प्लास्टिक प्रदूषणविरोधी चर्चासत्र महाराष्ट्र निसर्ग उद्यानात आयोजित करण्यात येणार आहे. चर्चासत्रात सहभागी कर्मचाऱ्यांना देशी वृक्षांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र निसर्ग उद्यान हे पर्यावरण शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र असून MMRDA च्या पुढाकाराने इथे अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवले जातात. हे उपक्रम केवळ वृक्षलागवडीपुरते मर्यादित नसून, पर्यावरण साक्षरता आणि जनजागृती यांना चालना देतात.

---











